३) सर्व साधारण सभा दोन प्रकारच्या असतील. १) वार्षिक सर्व साधारण सभा व २) विशेष सर्व साधारण सभा.

**३२) सर्वसाधारण सभेची कामे व अधिकार :**

बँकेचे संचालक मंडळ ठरावाद्वारे दरवर्षी आर्थिक वर्ष संपलेनंतर सहा महिन्याचे आत वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करेल. सदर सभा खालील कामकाजाकरीता बोलावली जाईल.

१) मागील साधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) बँकेच्या संचालक मंडळाने बँकेच्या कार्याबद्दल सादर केलेल्या वार्षिक अहवालावर विचार करणे व तो स्वीकृत करणे.

३) लेखापरिक्षण झालेल्या ताळेबंद व नफा-तोटा पत्रकावर विचार करणे व स्वीकृत करणे.

४) लेखापरिक्षकांच्या लेखापरिक्षण अहवाावर विचार करणे व स्वीकृत करणे.

५) कायदा व नियम यास अनुसरुन नफा वाटणीस मान्यता देणे व लाभांश जाहीर करणे.

६) पुढील वर्षाकरीता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची आणि प्रगतीच्या तक्त्याची माहिती घेणे व मान्यता देणे.

७) बँकेच्या लाँग टर्म पर्सपेक्टीव्ह प्लॅन व वार्षिक कार्यवाहीचा अहवाल यास मान्यता देणे.

८) सभासदांचे निष्कासन करणे- जर असेल तर

९) पोटनियम दुरुस्ती करणे - जर असेल तर

१०) अंतर्गत लेखापरिक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे मानधन ठरविणे.

११) सेवकांची रचना व नेमणूकीस मान्यता देणे - जर असेल तर.

१२) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.

१३) बँकेच्या स्वत:च्या उपयोगीतेकरीता खरेदी केलेलर जमीन किंवा इमारत, इमारतीचे बांधकामास मान्यता.

१४) बँकेच्या सभासदांचे शिक्षण व प्रशिक्षण याकरीता बँकेने केलेल्या प्रयत्नांनी तसेच याबाबतच्या पुढील वर्षाच्या योजनेची नोंद घेणे.

१५) मागील लगतच्या वर्षाच्या लेखा परिक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल चर्चा करणे व स्विकारणे.

१६) सभेत हजर असणाऱ्या दोन तृतीयांश सभासदांच्या परवानगीने कोणाही सभासदास सभेच्या विषय पत्रिकेत नमूद न केलेला विषय मांडता येईल. मात्र पोटनियम सुधारणा, संचालक मंडळ सदस्य काढून टाकणे, संस्थेचे कर्ज विषयक धोरण या व एखाद्या विषयाचा सहा महिनेचे आत पुर्नविचार करणे संबधीचा विषय असता कामा नये.

मा.अध्यक्षांच्या परवानगीने ठेवण्यात येणारे अन्य कोणतेही विषय.